ISSN 2231-1629
Knowledge Resonance

*A Half Yearly National Peer-Reviewed & Indexing with SJIF Impact Factor Research Journal*

**IMPACT FACTOR 8.072**

# लोकशाही न्यायव्यवस्थेतील न्याय–लोकअदालत

**चंद्रमणी काशीनाथ भोवते**

*सहा. प्राध्यापक राज्यशास्त्र*

*स्व. निर्धन पाटील वाघाये महाविद्यालय एकोडी*

*ता. साकोली, जि. भंडारा*

***सारांश:–***

*आज देशाची लोकसंख्या सव्वा अब्जावर गेली आहे. या वाढत्या लोकसंख्येच्या तुलनेत न्यायालयाचे आणि पर्यायाने न्यायादिशांची संख्या वाढणे अपरिहार्य होते, परंतु प्रत्यक्षात तसे झाले नाही. वाढत्या लोकसंख्येमुळे न्यायालयात प्रवि" ठ होणाऱ्या प्रकरणांची संख्या प्रचंड प्रमाणात वाढली तर दुसरीकडे या प्रमाणात न्यायालयांची संख्या वाढली नाही. त्यामुळे न्यायव्यवस्थेवर प्रचंड ताण पडला आहे. परिणामी पर्यायी न्यायव्यवस्था म्हणून लोक अदालत उदयास येऊन तिने आपले पाळेमुळे भारतात मजबूत करण्यास सुरूवात केली आहे.*

***मुख्यशब्द :–***

*न्याय, जनता, संविधान, लोकअदालत, भारतीय.*

•

**प्रस्तावना :–**

आज देशासमोर वाढत्या लोकसंख्येची समस्या जेवढी गंभीर बनली आहे, तेवढीच गंभीर समस्या न्यायालयातील प्रलंबीत खटल्यांबद्दल आहे. अशा प्रलंबीत प्रकरणांची संख्या पाहता असे दिसून येते की, देशात विविध न्यायालयात जवळ जवळ तिन कोटीच्या वर प्रकरणे प्रलंबीत आहेत. 1987 ला हीच प्रलंबीत प्रकरणांची संख्या दीड कोटी होती.(1) म्हणजेच गेल्या तीन दशकात प्रलंबीत खटल्यांची संख्या किती झपाटयाने वाढली आहे हे दिसून येते.

आज भारत जगातील सर्वात मोठा लोकशाही देश म्हणून ओळखला जातो. लोकसंख्येच्या बाबतीतही आपला भारत जगाच्या दूसऱ्या क्रमांकावर आहे. लोकसंख्येप्रमाणेच न्यायालयातील प्रलंबीत खटल्यांची संख्या सुध्दा गंभीर समस्या बनलेली आहे. वर्ल्ड जस्टीस प्रोजेक्ट (World Justice Project) च्या 2017–2018 च्या रूल ऑफ लॉ (Rule of Law) इंडेक्सनुसार आपला देश जगात 62 व्या क्रमांकावर आहे तर मुलभूत अधिकारांच्या अंमलबजावणीत – 75, कायदा आणि सुव्यवस्था – 98, सिव्हील जस्टीस – 97, क्रिमिनल जस्टीस – 66 व्या क्रमांकावर आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे सरन्यायाधिश मा. दिपक मिश्रा यांनी 28 जुन 2018 रोजी एका कार्यक्रमप्रसंगी राष्ट्रीय न्यायीक डाटा ग्रिड (NJDJ) च्या हवाल्याने सांगीतले की, आज घडीला भारतात सर्वोच्च न्यायालयात – 57987 तर उच्च न्यायालयात – 43 लाख आणि जिल्हा व तालुका न्यायालयामध्ये 2 करोड 84 लाख केसेस (खटले) प्रलंबीत आहेत. उत्तरप्रदेश (61.58 लाख), महारा" ट्र (33.22 लाख), पश्चिम बंगाल (17.59 लाख), बिहार (16.58 लाख) आणि गुजरात (16.45 लाख) या पाच राज्यात सर्वात जास्त खटले प्रलंबीत आहेत.

या प्रलंबीत खटल्याच्या आकडेवारीवरून देशातील न्याय व्यवस्थेवर किती प्रचंड ताण आहे हे लक्षात येते. तसेच न्याय व्यवस्थेतील चिंतनीय बाब आहे हे दिसून येते. जन सामान्यांना वेळेवर न्याय मिळणे कठीण बनले आहे. वर्षानुवर्षे न्यायाची प्रतिक्षा करावी लागत आहे. "न्यायास विलंब म्हणजे न्याय नाकारणे" असा समज यातून निर्माण झाला आहे. न्यायदान पध्दतीवरील विश्वास उडत चालला आहे.' शेकडो वर्षापासून सुरू असलेल्या न्यायदान परंपरेला तडा जातो की काय अशी भिती निर्माण झाली आहे. म्हणूनच न्यायदान पध्दतीत सुधारणा हा एक अभ्यासाचा विषय बनला आहे. हा संशोधनाचा विषय बनला आहे.


स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आदर्श राज्यघटना निर्मितीचे प्रयत्न सुरू झाले. समाजवादी समाजरचना आणि कल्याणकारी रचना यांना प्रत्यक्षात आणण्यासाठी जाणीवपुर्वक प्रयत्न झाले. याच प्रयत्नाचा एक भाग म्हणजे भारतीय राज्यघटनेतील कलम 39 भारताचा संविधानाचा अनुच्छेद 39 मध्ये तशी तरतुद आहे की, राज्य हे कायद्याची यंत्रणा राबवतांना समानसंधीच्या तत्वावर न्यायाची अभिवृध्दी होईल याची खात्री करून घेईल आणि विशेषतः आर्थिक किंवा अन्य निःसमर्थतामुळे कोणत्याही नागरीकांला न्याय मिळण्याची संधी नाकारली जाणार नाही, याची खात्री करून घेण्यासाठी मोफत कायदे विषयक सहाय्य उपलब्ध करून देईल.

मोफत कायदेविषयक मदत आणि न्यायाची संधी ही तत्व या कलमात अंतर्भुत आहेत. सामाजिक मागासलेपणा किंवा आर्थिक दृष्टया दुर्बलता या कारणांमुळे कोणीही न्यायापासून वंचित राहू नये ही तरतूद या कलमात करण्यात आली आहे. विधीसेवा विषयक तरतूदी याच कलमावर आधारीत आहेत. कायदेविषयक सहाय्य आणि सल्ला योजना आणि लोक न्यायालय यांना हाच घटनात्मक आधार आहे. या आधारावरच विविध राज्यांमध्ये लोकन्यायालयाची सुरूवात झाली यात महाराष्ट्र राज्य अग्रणीय आहे.

सामाजिक न्यायाची संकल्पना मांडणारे महात्मा ज्योतिबा फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची महाराष्ट्र ही कर्मभूमी आहे. 39अ कलमाच्या प्रत्यक्ष अंमलबजावणसाठी महाराष्ट्र राज्याने "कायदेविषयक सहाय्य" योजना सुरू केली. या योजनेला "The Maharashtra State legal Aid and Advice Scheme, 1979" असे म्हणतात. भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीपासून ही कल्याणकारी योजना

14 एप्रिल, 1979 ला सुरू करण्यात आली. राज्यातील शहरी आणि ग्रामिण भागासाठीही ही योजना सुरू केली गेली. या योजनेचे महत्वपूर्ण वैशिष्टय असे की, यात न्यायाधीश विधिज्ञ, सामाजिक कार्यकर्ते आणि ' ाासकीय अधिकारी यांचा सहभाग ठेवण्यात आला आहे.

पुढे 1981 साली "महाराष्ट्र राज्या कायदेविषयक सहाय्य व सल्ला मंडळ नियम 1981" तयार करण्यात आले. अशा या नियम 10(1) नुसार समेट शाखेची तरतुद करण्यात आली. कायदेविषयक सहाय्य योजना व सल्ला कार्यक्रम सुरू केल्यावर लगेच समिती एका समेट शाखेची स्थापना करेल अशी तरतुद आहे. समेट शाखेचे पॅनल त्याने ठरविलेल्या वेळी व ठिकाणी दोन्ही पक्षकाराचे म्हणणे ऐकून घेईल व दाव्यात किंवा वादात समेट घडवून आणण्याचा प्रयत्न करील. कायदेविषयक सहाय्य व सल्ला समितीची ही 'समेट शाखा' म्हणजे लोकन्यायालयाचेच स्वरूप होते. 1980 ला केंद्रशासनाने मा. न्या. पी. एन. भगवती यांचे अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीने 1984 ला आपला हा अहवाल सादर केला कायदेविषयक समिती सहाय्य आणि लोकन्यायालयाच्या दृष्टीने हा मा. न्या. भगवती यांचा अहवाल महत्वाचा मानला जातो. हाच अहवाल आक्टोंबर 1987 ला संसदेने मान्य केला. 11 ऑक्टोंबर 1987 या दिवशी यावर राष्ट्रपतीची स्वाक्षरी झाली आणि "विधिसेवा प्राधिकरण कायदा 1987" अमलात आला. लोक अदालतला कायदेशिर स्वरूप 1987 ला देण्यात आले. या कायद्यातील सहाव्या प्रकरणात कलम 19, 20, 21 आणि 22 मध्ये लोकअदालत विषयीच्या तरतूदी करण्यात आल्या आहेत. 1994 ला या कायद्यातील काही भागात दुरूस्ती करण्यात आली. 1998 पासून विधीसेवा प्राधिकरण स्वरूपात संपूर्ण देशात ही योजना कार्यरत झाली.




भारतात पहिले लोकन्यायालय 14 मार्च, 1982 ला गुजरात राज्यात सुरू झाले. जुनागड जिल्हयातील उना येथे पहिले लोक अदालत संपन्न झाले. सर्वोच्च न्यायालयाचे तत्कालीन न्यायमुर्ती मा. डी. ए. देसाई यांच्या हस्ते या लोक अदालताचे उद्घाटन झाले. लोक अदालताच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे यासाठी ॲड. नलिनीकांत दवे यांनी 1989 पासून उत्कृष्ट कार्य करणाऱ्या जिल्हयासाठी फिरती ढाल ठेवली आहे.

महाराष्ट्रातील पहिले लोक न्यायालय मुंबई उच्च न्यायालयात महाराष्ट्र बार असोशिएशनच्या सौजन्याने 21 जानेवारी, 1984 रोजी आयोजित करण्यात आले. लोक न्यायालयाचे मुख्य प्रवर्तक मा. न्या. पी. एन. भगवती यांच्या प्रमुख उपस्थितीत हे लोक न्यायालय संपन्न झाले. त्यानंतर हळुहळू महाराष्ट्रात सर्वत्र लोकन्यायालयाचे आयोजन करणे सुरू झाले. नागपूर येथे दिनांक 23 मार्च, 1994 रोजी नागपूर कायदेवि" ायक सहाय्य व सल्ला समितीच्या वतीने लोक न्यायालय झाले. मुंबई उच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमुर्ती श्री. देसाई यांच्या उपस्थितीत लोकन्यायालयाची सुरूवात झाली. लोकन्यायालय कार्यास गती मिळावी यासाठी महाराष्ट्र कायदेविषयक सहाय्य आणि सल्ला समितीने "महाराष्ट्र स्टेट लोक न्यायालय नियम 1986" तयार केले. या नियमांमुळे महाराष्ट्रात लोक अदालत कार्यात मोलाच्या सुधारणा घडून आल्या.

लोकन्यायालयाच्या न्यायव्यवस्थेतील या प्रयोगाला महाराष्ट्रात साडेतीन दशक पूर्ण झाले आहे. भारतीय न्याय व्यवस्थेतील पोषक असलेला हा अभिनव प्रयोग आहे.

आज देशामध्ये डिसेंबर 2019 पर्यंत सर्वोच्च न्यायालयात 59535 तर उच्च न्यायालयामध्ये 4526079 आणि ईतर न्यायालयामध्ये 31524931 ईतके खटले प्रलंबीत असून त्यापैकी महाराष्ट्रातील 4507104 ईतक्या खटल्यांचा समावेश आहे. सन 2001 पासून जानेवारी 2020 पर्यंत महाराष्ट्रात 59895 एवढया सर्व प्रकारच्या लोक अदालतींचे आयोजन करण्यात येऊन या लोक अदालतींमध्ये 4945690 एवढे खटले समोपचाराने सोडविण्यात येऊन त्यांचा फायदा 9235122 ईतक्या लोकांना झाला. यावरून लोक अदालतीच्या जलद

न्यायदान पध्दतीचे महत्व दिसून येते. कुणावरही अन्याय न करता दोन्ही पक्षकारांना मान्य होईल अशी तडजोड करून दोघांनाही कायद्याशी सुसंगत असा न्याय देणे हे लोक न्यायालयाचे मुलभूत सुत्र आहे.

संविधानिक न्यायप्रणालीला पूरक, मुख्यत्वे लोकांचा सहभाग असलेली, पक्षकारांना परवडणारी, कमी खर्चाची आणि सुलभ व लवकर न्याय मिळवून देणारी न्याययंत्रणा, समाजातील सर्व लोकांना विशेषतः दुर्बल, मागास व न्यायापासून वंचित असलेल्यांना तिचा चांगला फायदा होत आहे.

आज लोकअदालतीबद्दल भारतीय जनतेमध्ये विश्वासाची भावना निर्माण झाली आहे. लोकअदालतीमध्ये मानवी भाव–भावनांना विचारात घेऊन निष्पक्ष व नैसर्गीक न्याय दिला जातो. या दृष्टीने आधुनिक काळात लोकअदालती प्रकर्शान विकसीत होत आहेत. भारतात लोकअदालतींचा जन्म होऊन जवळपास 40 वर्षे झाली आहेत. पण या काळात करोडो लोकांचे प्रश्न, वादविवाद सोडविले गेले आहेत. लोकअदालतीचे मुख्य ध्येय हे सर्वांना समान व जलद, भ्रष्टाचार रहित, कोणत्याही स्वरूपात वैराची भावना न बाळगता विनामुल्य न्याय मिळाला पाहिजे हा आहे.

**लोकन्यायालयाची कायदेशीर बाजू** :–

1. विधी सेवा प्राधिकरण कायदा, 1987
2. या कायदातील कलम 19 ते 22 मध्ये लोकन्यायालयाची स्थापना, रचना, अधिकारक्षेत्र, आयोजन, कार्यपध्दती इत्यादींबाबतच्या तरतुदी विहित करण्यात आल्या आहेत.
3. संबंधित घटनात्मक तरतुदी
4. राज्यघटनेच्या अनुच्छेद 39अ अन्वये राज्य, वंचित आणि दुर्बल नागरिकांना मोफत विधी सुविधा उपलब्ध करून देईल अशी तरतूद करण्यात आली आहे.

**लोकन्यायालयाचे प्रकार** :–

1. **तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावरील लोकन्यायालये**. – ही न्यायालये त्या त्या स्तरावरील विधी सेवा प्राधिकरणे किंवा विधी सेवा समित्यांकडून ठराविक कालांतराने आणि न्यायालयाबाहेर उचित ठिकाणी आयोजित करण्यात येतात.
2. **राष्ट्रीय लोकन्यायालय** – ठराविक काळाने सर्वोच्च न्यायालय ते तालुकास्तरापर्यंत सर्वच स्तरावर संपूर्ण देशात एकाच दिवशी या न्यायालयाचे आयोजन करण्यात येते. यादिवशी मोठया प्रमाणात प्रकरणांचा निपटारा होतो. सन 2015 पासून एका ठराविक बाबींशी संबंधित प्रकरणे निकाली काढण्यासाठी दर महिण्यास राष्ट्रीय लोक न्यायालये भरविली जातात.
3. **स्थायी लोकन्यायालय** – लोक सेवांशी संबंधीत प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी केंद्र आणि आवश्यकतेनुसार राज्यस्तरावर स्थायी लोकन्यायालय स्थापन करण्याची तरतुद विधी सेवा प्राधिकरण कायद्याच्या कलम 22ब अन्वये करण्यात आली आहे. सार्वजनिक वाहतुक, पोस्ट, दूरध्वनी, टेलिग्राफ, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, सार्वजनिक आरोग्यसेवा, विमासेवा व शासनाने लोकसेवा म्हणून मान्यता दिलेल्या सेवांबाबत नागरिकांच्या तक्रारी व प्रकरणेही या न्यायालयांची कार्यकक्षा आहे.

**लोकन्यायालयाची रचना व आयोजन** :–

1. तालुका, जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर या न्यायालयांचे आयोजन करण्यात येते. या सर्व स्तरांवरील न्यायालयांमध्ये तीन सदस्यांची नियुक्ती करण्यात येते.
2. राज्य विधी सेवा प्राधिकरण, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, तालुका विधी सेवा प्राधिकरण तसेच सर्वोच्च न्यायालय व उच्च न्यायालयांमधील विधी सेवा समित्या या लोकन्यायालयांचे आयोजन करतात.

**लोकन्यायालयांचे अधिकारक्षेत्र** :–

1. आयोजक प्राधिकरण किंवा न्यायालयाचे ठरवून दिलेल्या अधिकारक्षेत्रानुसार लोकन्यायालये न्यायदानाचे कार्य करतात. या अधिकारक्षेत्राच्या अंतर्गत कोणत्याही न्यायालयासमोर प्रलंबीत असलेला किंवा न्यायालयात दाखल न केलेला खटला/विवाद/प्रकरण यावर लोकन्यायालय निकाल देऊ शकते.
2. कोणत्याही कायद्यानुसार समझौता/तडजोड करण्याची परवानगी नसलेल्या प्रकरणांबाबत या न्यायालयांमध्ये सुनावणी करता येत नाही.
3. दोन्ही पक्षकारांनी ठरविल्यास त्यांचे प्रकरण किंवा एखाद्या न्यायालयाची खात्री पटल्यास असा खटला पक्षकारांच्या संमतीने लोक न्यायालयाकडे वर्ग करता येतो.
4. सार्वजनिक वाहतूक, पोस्ट, दूरध्वनी, टेलिग्राफ, पाणीपुरवठा, वीजपुरवठा, सार्वजनिक आरोग्यसेवा, विमासेवा व शासनाने लोकसेवा म्हणून मान्यता दिलेल्या सेवा हे स्थायी लोकन्यायालयाचे अधिकारक्षेत्र आहे.

**लोकन्यायालयांचे अधिकार** :–

1. विधी सेवा प्राधिकरण कायदा कलम 22 अन्वये लोक न्यायालयांना दिवाणी न्यायालयांचे अधिकार देण्यात आले आहेत. यामध्ये पुढील बाबींचा समावेश होतो.
2. कोणत्याही साक्षीदारास समन्स बजावणे आणि शपथेवर साक्ष देण्यास सांगणे.
3. कोणत्याही दस्ताएवेजांची तपासणी आणि शोध.
4. शपथपत्रांवर साक्षी नोंदवून घेणे.
5. कोणत्याही' शासकीय कार्यालयातील अभिलेख किंवा दस्तावेजांची मागणी करणे.

**निकाल** :–

1. लोकन्यायालयांनी दिलेले निकाल हे दिवाणी न्यायालयांच्या हुकूमनाम्याच्या दर्जाचे असतात.

2. लोक न्यायालयाच्या निकालाविरोधांत अन्य न्यायालयात अपिल करता येत नाही. या निकालाने पक्षकाराचे समाधान न झाल्यास अन्य न्यायालयात नव्याने खटला दाखल करण्याची मुभा असते.
3. स्थायी लोक न्यायालयाचा निकाल हा अंतिम निकाल असतो आणि तो सर्व पक्षकारांवर बंधनकारक असतो. हा निकाल दिवाणी न्यायालयाकडून हुकूमनाम्याप्रमाणे अंमलात आणण्यात येतो.

**निष्कर्ष :–**

1. लोकन्यायलायांमध्ये दाखल करण्यात आलेल्या प्रकरणांचे शुल्क भरावे लागत नाही हे खटले निःशुल्क चालविण्यात येतात. जी प्रकरणे न्यायालयीन शुल्क भरून दाखल करण्यात आली व नंतर संबंधीत न्यायालयाने त्यांना लोकन्यायालयाकडे वर्ग केले, त्या प्रकरणांमध्ये तडजोड वा निकाल लागल्यावर भरलेले शुल्क पक्षकारांना परत देण्यात येते.
2. लोकन्यायालयेही कायदेशीरपणे स्थापन झालेली असतात. त्यांच्या स्थापनेमागे फारशी गुंतागुंत नसलेली प्रकरणे निकाली काढण्याच्या हेतू असतो. त्यामुळे अशी प्रकरणे शक्यतो तडजोड/ समझोत्याच्या माध्यमातून सोडविण्यावर भर असतो.

**संदर्भ ग्रंथ**

1. *Dibkar Sahu: The concept of justice, Atlantic Publishers and Distributors, Delhi 1938, P. No. 10*
2. *John Rawls: A Theory of Justice, Oxford University Press (1972), P. No. 11,12*
3. *डॉ. आर. एस. मोरखंडीकर : प्राचिन भारतीय राजनीती, परिमन प्रकाशन औरंगाबाद, 1976 पृष्ठ क्र. 172*
4. *Bhatia, H. S. Ed: Origin and Development of Legal and Political System In India, II Vatum, New Delhi, 1976*
5. *Setalvad, M. C.: Common Law In India, Bombay, 1970*
6. *माजा दारूवालाः इंडीया जस्टीस रिपोर्ट – 2019*
7. *डॉ. पुष्पकराज शेखरराव इंदूरकरः लोकन्यायालय व न्यायालयीन गतिमानताः नांदेड – परभणी जिल्हयाचा चिकित्सक अभ्यास*
8. *Virendera Shah: Judicial administration in Amcient India, Anmol Prakashan, New Delhi, 1979, P. No. 27*
9. *Sunil Desnta: Lokadalat in India, Deep Publication, New Delhi (1955), P. No. 35*
10. *दैनिक लोकसत्ता संपादक : गिरिश कुबेर, दि. 21 ऑक्टोंबर, 2020, पेज क्र. 11*